REGISTERED No. B 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाविलास' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४.
(टपाल हंशिल माफ)
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र.

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष ६ पुणें, बुधवार, तारीख १ मे, १९४० अंक १८

## " अर्थ " ग्रन्थमालेंतील पुस्तकें

व्यापार, उद्योगधंदे, शेती, सहकार, बँकिंग इत्यादि विषयांवरील सोपीं व व्यावहारिक उपयुक्तेचीं लोकप्रिय पुस्तकें.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
दुसरी आवृत्ति किं. १ रु. ८ आ.
२ रिझर्व्ह बँक : किं. १ रु.
३ व्यापारी उलाढाली : किं. १ रु.

* * *

१ भारतीय अर्थशास्त्र : किं. ५ रु.
२ अर्थशास्त्र : किं. ३ रु.

अर्थशास्त्र, बँकिंग, सहकार इत्यादि विषयांवरील इतर पुस्तकेंहि पुरविलीं जातील.

अर्थ ग्रन्थमाला, पुणें ४.

मुंबई प्रान्ताच्या शाळाखात्यानें लायब्ररीसाठी मंजूर केलेलें व असिस्टंट रजिस्ट्रारसाहेब यांनीं शिफारस केलेलें पुस्तक.

## फर्म, कंपनी, सोसायटीचा कायदा

(लेखकः—श्री. के. बा. गजेन्द्रगडकर, बी. ए. ऑनर्स,)
एलएल. बी. वकील.

या पुस्तकांतील कायद्यासंबंधीं विवेचन मुंबई इलाख्यांतील कायद्याला धरून आहे. तिकिटरूपानें ८६ पाठवून एक प्रत संग्रही ठेवा.

तसेंच शेतकऱ्यांना ऋणमुक्त करण्यासाठी मुंबई सरकारनें नवीनच पास केलेला

## — शेतकरी ऋणविमोचन कायदा —

मराठी भाषेंत छापत आहे. १ रु. पाठवून नांव नोंदवा मागाहून किंमत जास्त पडेल. तरी आजच ऑर्डर द्या.

पत्ता मॅनेजर, सेन्ट्रल लॉ हाऊस.
टिळक रोड, नागपूर शहर.

चेअरमन,
व्ही. एन. पाटील, एस्क्वायर,
एम. ए., कँटब, बार-ॲट-लॉ,
माजी एम. एल. सी.

मॅनेजिंग एजंट,
पी. आय. पाटील ॲंड सन्स

पंचवार्षिक बोनस
तहहयात रु. ६० दर हजारी हयातींत रु. ५०

प्रगतीच्या पथावर असलेली
दि
## ग्रेट सोशल लाईफ ॲण्ड जनरल ॲशुरन्स लिमिटेड.
ब्रँच ऑफिस-लक्ष्मीरोड, पुणें. S एजन्सीकरितां आजच लिहा. S हेड ऑफिस-जळगांव, पू. खा.

पूर्ण स्वदेशी,
कमी प्रिमियम, जास्त नफा,
विमेदारांस अत्यल्प हप्त्यांत
भरपूर सवलती
आधुनिक शास्त्रशुद्ध विम्याच्या उपयुक्त विविध योजना. सविस्तर माहिती मागवा.

के. जी. चौधरी,
लाईफ मॅनेजर.

के. एच. सुराणा विमा केसरी,
जनरल मॅनेजर.

# विविध माहिती

### युद्ध बजेट

सर जॉन सायमन ह्यांनीं कॉमन्स सभेस युद्धबजेट नुकतेंच सादर केलें तेवढें मोठें बजेट कोणत्याहि ब्रिटिश फडनवीसांनीं आतांपर्यंत पुढें मांडलें नव्हतें. सुमारें १२२३ कोटी पौंड उत्पन्नाची त्यांनीं तरतूद केली आहे.

### वीस लक्ष सैनिक युद्धास तयार

ब्रिटिश साम्राज्यांत आतां वीस लक्ष सैन्य युद्धास तयार आहे. ह्या संख्येंत आरमार, विमानी फौज, पोलीस इत्यादि लढाऊ लोकांचा समावेश केलेला नाहीं.

### स्वीडनची स्वसंरक्षणाची तयारी

आपल्या स्वातंत्र्यावर जर्मनी गदा आणणार अशी भीति स्वीडनला वाटत असून स्वतःच्या रक्षणाची तयारी त्या राष्ट्रानें चालविली आहे. स्वीडिश सरकारनें ५० कोटि क्रोनरचें (४० कोटि रुपये) कर्ज उभारण्याचें ठरवलें आहे. कर्ज पांच वर्षे मुदतीचें असून त्याच्या व्याजाचा दर ४ टक्के आहे.

### जर्मन फौज

जर्मनीनें ७० लक्ष शिपाई सशस्त्र सज्ज केले आहेत, असें म्हणतात. लढाऊ कारखान्यांत स्त्री-कामगारांची भरती वाढत्या प्रमाणांत केली जात आहे.

### हिंदुस्थानची साखर विलायतेंत न्या

हिंदुस्थानांत स्वदेशी साखरेचा भरपूर साठा असल्यानें ब्रिटिश साम्राज्यांतील देशांनीं ह्याच माल घेणें अगत्याचें आहे असें इंडिअन शुगर मिल्स असोसिएशननें ब्रिटिश सरकारास कळवलें आहे. ब्रिटिश पौंडाशीं ज्यांच्या चलनाचा स्थिर संबंध आहे अशा देशांतूनच माल घेणें श्रेयस्कर आहे असें त्या संस्थेनें म्हटलें आहे.

### आळशी, एरंडी वगैरे गळितांच्या किंमती

हिंदी गळिताच्या धान्यांस इंग्लंडमध्यें योग्य भाव मिळावा ह्या मागणीस अनुलक्षून सरकारनें असें आश्वासन दिलें आहे कीं आर्जेन्टाइन व ब्राझिल येथील मालाच्या तुलनेनें योग्य किंमती निश्चित केल्या जातील.

### लहान धंद्यांच्या शिक्षणाचे फिरते वर्ग

बुटांच्या व फायलींच्या दोन्या, नवारी, सतरंज्या वगैरे तयार करण्याचें शिक्षण देण्यासाठी फिरते वर्ग चालवण्याचें मुंबई सरकारनें ठरवलें आहे. काथ्याचे दोर, ब्रश वगैरे करण्याची व्यावहारिक माहिती देण्याची ह्याच प्रकारची व्यवस्था होत आहे. शिकणाऱ्या उमेदवारांस दर महिना ५ रुपये देण्यांत येतील आणि प्रत्येक वेळीं दहा उमेदवार घेतले जातील.

### जर्मन व्यापाराची स्वित्सर्लंड मार्फत नाकेबंदी

इंग्लंड व फ्रान्स ह्या राष्ट्रांनीं स्वित्सर्लंडशीं व्यापारी करार नुकताच केल्याचें प्रसिद्ध झालें आहे. त्या अन्वयें स्वित्सर्लंडमध्यें जाणारा परदेशांतील माल जर्मनीस मिळूं नये अशी तजवीज करण्यांत आली आहे. स्वित्सर्लंडला स्वतःच्या उपयोगाकरितां लागणारा माल बिनहरकत त्या देशांत जाऊं दिला जाईल.

### आठ वर्षांत आठ मुख्य प्रधान

गेल्या आठ वर्षांत जपानमध्यें आठ निरनिराळे मुख्य प्रधान होऊन गेले.

### सार्वजनिक मुद्द्या कमी होत नाहींत

सार्वजनिक मुद्द्यांची संख्या कमी करण्याच्या प्रश्नाचा विचार करण्यासाठी मुंबई सरकारनें एक कमिटी नेमली होती. आहेत त्या मुद्द्या तशाच चालू ठेवाव्या, त्यांची संख्या कमी करूं नये असें कमिटीनें बहुमतानें सुचवलें असून सरकारनें ही शिफारस मान्य केली आहे.

### आगकाड्या

ग्रेटब्रिटनमध्यें दरसाल ५१½ अब्ज आगकाड्या लागतात.

### आरोग्य व शरीरसामर्थ्य

ब्रिटिश लष्करांत दाखल करण्यापूर्वी उमेदवारांच्या ग्रेटब्रिटनमध्यें १० फेब्रुवारीपर्यंत घेण्यांत आलेल्या वैद्यकीय परीक्षेंत प्रत्येक चारांपैकीं तिघेजण उत्कृष्ट रीतीनें उत्तीर्ण होऊन लढाईवर जाण्यास लायक ठरले.

### पारा

पाऱ्याचें महत्त्व दिवसानुदिवस वाढत आहे. पाऱ्याच्या वाफेच्या सहाय्यानें इंजनें चालवितां येतील आणि त्यास खर्चहि फार थोडा पडेल. पाऱ्याच्या एकूण उत्पादनापैकी तीन-चतुर्थांश उत्पादन स्पेनमध्यें होतें. धातूंमध्यें लोखंडाचें खालोखाल पाऱ्याचें महत्त्व आहे.

### लंडन शहराचा विस्तार

लंडन शहरानें ६९३ चौरस मैल जागा व्यापिली आहे. न्यू यॉर्कचा विस्तार त्याचे खालोखाल म्हणजे २९९ चौरस मैल आहे. लंडन हें जगांतील सर्वांत विस्तीर्ण शहर आहे.

### खानेसुमारीसाठी १½ लक्ष लोकांची नेमणूक

अमेरिकेंतील खानेसुमारीचे कामांत सध्या १ लक्ष, २१ हजार लोक गुंतले आहेत.

### म्हैसूर संस्थानांतील वैद्य व हकीम

म्हैसूर संस्थानांतील सरकारी आयुर्वेदिक व युनानी विद्यालयांत १७१ वैद्य ४६ हकीम शिकून तयार झाले आहेत. देशी पद्धतीच्या दवाखान्यांचा फायदा घेणारांची संख्या वाढत आहे.

### ॲंग्लो-फ्रेंच पोस्टाचें तिकिट

इंग्लंड व फ्रान्स ह्या राष्ट्रांच्या दृढ मैत्रीचें दृश्य द्योतक म्हणून एक ॲंग्लो-फ्रेंच पोस्टाचें तिकिट येत्या नोव्हेंबरमध्यें काढण्याचें ठरलें आहे.

### इंग्लंड दक्षिण अमेरिकेंतून अधिक कापूस घेणार

इंग्लंडनें संयुक्त अमेरिकन राष्ट्रास असें कळवलें आहे कीं त्या देशांतून कापसाची ब्रिटिश आयात कमी करण्यांत येऊन त्याची जागा दक्षिण अमेरिकेच्या देशांतील कापसानें भरून काढली जाईल. ह्या देशांचा जर्मनीशी चालणारा व्यापार बंद पडला आहे त्याची जागा ब्रिटिश व्यापार घेणार असा ह्याचा अर्थ आहे.

### स्वदेशी सुवासिक द्रव्यें

अत्तरांत, साबणांत वगैरे उपयोगांत येणारीं सुवासिक द्रव्यें हिंदुस्थानांत बनवण्याचा धंदा सुरू करतां येईल अशी अपेक्षा आहे. हिंदी कच्च्या मालापासून हीं द्रव्यें तयार करण्याच्या बाबतचे शास्त्रीय प्रयोग कलकत्त्यांत चालले आहेत.

### जुने कपडे

प्रश्नः—"तूं तुझ्या जुन्या कपड्यांचें काय करतोस?"

उत्तरः—"रात्रीं काढतों, आणि दुसऱ्या दिवशीं सकाळीं पुनः घालतों."

अनुक्रमणिका


| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती .... | २०६ | ट्रॉपचें लंगडें समर्थन | |
| २ हिंदुस्थानांत बँकांचा शाखाविस्तार ... | २०७ | ५ हॅरल्ड बँकेच्या अध्यक्षांचें भाषण ... ... | २११ |
| ३ औद्योगिक बँक जपानचें उदाहरण ... | २०८ | ६ दि सांगली बँक लि. | २१२ |
| ४ स्फुट विचार ... | २०९ | ७ " यावतैलम् नावदाल्यानम् " ... | २१३ |
| ब्रिटिश युद्धबजेट–लोकल बोर्डस आणि प्राथमिक शिक्षणाचा खर्च–लोकल बोर्डांची जबाबदारी आणि सरकार–लोकशिक्षण आणि ग्रन्थालयें–मुंबई प्रांतांतील कामगार संघ–हेर रिबेन- | | ८ मुक्या जनावरांची कामगिरी ... ... | २१४ |
| | | ९ " येथें येथें तर्के साचें " | २१४ |
| | | १० कला कुसरींच्या कामाचें शिक्षण ... | २१४ |
| | | ११ पदकें ... | २१४ |
| | | १२ निवडक बाजारभाव | २१६ |



# अर्थ

बुधवार, ता. १ मे, १९४०


## हिंदुस्थानांत बँकांचा शाखा–विस्तार

(१)

### लहानमोठ्या शहरांत बँकांची विभागणी

आधुनिक पद्धतीच्या बँकिंगच्या सोयींचे दृष्टीनें पाश्चात्य राष्ट्रांशीं तुलना करतां हिंदुस्थान फारच मागसलेला आहे असें नेहमीं सांगण्यांत येतें. जनतेस बचत करण्यास उत्तेजन देऊन गरजू धंदेवाल्यांची भांडवलाची गरज भागवणें हें कार्य बँका करीत असतात आणि पाश्चात्य देशांत अशा बँकांच्या शाखांचें जाळें लहान-मोठ्या शहरांत व गावांत पसरलेलें असतें. हिंदुस्थानांत परिस्थिति ह्याहून अगदीं निराळी आहे आणि येथें ज्यांमध्यें कोणत्याच प्रकारची बँक नाहीं अशीं अनेक शहरें आहेत.–बँकिंगच्या प्रसारास हिंदुस्थानांत इतका वाव असतांना तो न होण्याचीं विशेष कारणें आहेत, ह्यांत शंका नाहीं आणि सर्व लहान-मोठ्या शहरांत बँका किंवा त्यांच्या शाखा अल्प काळांत निघूं शकतील अशी अपेक्षा करण्यांत स्वारस्य नाहीं. तथापि, ह्या विषयाकडे वारंवार लक्ष वेधलें जाऊन शक्य तितक्या त्वरेनें मात्र सावधगिरीच्या धोरणानें प्रगति होणें आवश्यक आहे हें निर्विवाद आहे. बँकांच्या विस्ताराचे बाबतींत आज परिस्थिति काय आहे ह्याची माहिती ह्या दृष्टीनें उपयुक्त होईल. इंडिअन इन्स्टिट्यूट ऑफ बँकर्सच्या नियतकालिकाच्या ताज्या अंकांत प्रस्तुत विषयावर माहितीनें भरलेला असा एक लेख प्रसिद्ध झाला आहे. त्याच्या आधारानें हिंदी बँकांच्या विस्ताराबाबतचें विवेचन करण्याचें येथें योजिलें आहे.

उल्लेखित लेखांतील माहिती दहा वर्षांचे मागल्या शिरगणतीवर आधारलेली आहे आणि ब्रिटिश हिंदुस्थान व ब्रह्मदेश ह्यांस ती मर्यादित केलेली आहे, ह्या गोष्टी प्रारंभींच निदर्शनास आणणें जरूर आहे. विवेचनाचे सोयीसाठी एक लक्ष, पन्नास हजार, वीस हजार व पांच हजार अशी लोकसंख्या अनुक्रमें करून असलेल्या शहरांची चतुर्विध विभागणी करण्यांत आली आहे. ह्या सर्व गांवांतली वस्ती " शहरी " समजण्यास हरकत नाहीं आणि त्यांमधील जनतेच्या बँकिंग-विषयक गरजा अर्बन सहकारी बँका, व्यापारी जॉइंट स्टॉक बँका आणि सराफ-सावकार भागवतात असें गृहीत धरण्यास प्रत्यवाय नाहीं. वर निर्दिष्ट केलेल्या वर्गांपैकीं पहिल्या दोन वर्गांत मोडणाऱ्या शहरांची संख्या अनुक्रमें करून २९ व ५१ अशी होती. त्यांमध्यें व्यापार व उद्योगधंदे ह्या विषयींचे व्यवहार कमी-अधिक विस्तृत प्रमाणावर चालतात असें म्हणण्यास हरकत नाहीं. तिसऱ्या व चौथ्या प्रकारांच्या गांवांची संख्या २१४ व १४०१ अशी होती. त्यांतली आर्थिक व सामाजिक स्थिति अर्धवट शहरी व अर्धवट खेडेगावी स्वरूपाची असते. बँकांमध्यें पांच लक्ष रुपये इतकें भरलेलें भांडवल व रिझर्व्ह असणाऱ्या शेड्यूल्ड बँका आणि त्यापेक्षा कमी भांडवल असणाऱ्या इतर जॉइंट स्टॉक बँक्स असे दोन वर्ग पडतात. निरनिराळ्या आकारांच्या शहरांत ह्या दोन वर्गांच्या बँका व त्यांच्या शाखा कोणत्या प्रमाणांत होत्या ह्याची माहिती खालील कोष्टकांत दिली आहे:–

शहरें आणि बँकांची संख्या

| लोकसंख्येप्रमाणें शहरांचें वर्गीकरण | ब्रि. हिंदुस्थान व ब्रह्मदेश ह्यांत शहरें | शेड्यूल्ड बँका असलेलीं शहरें | शेड्यूल्ड बँक नाहीं पण बिगर शेड्यूल्ड बँक आहे | शेड्यूल्ड बँक असून बिगर शेड्यूल्ड बँकाहि आहेत | बँका असलेलीं एकूण शहरें |
|---|---|---|---|---|---|
| वर्ग १ ( १ लक्ष व आधिक लोकसंख्या | २९ | २९ | ... | २७ | २९ |
| वर्ग २ (५० हजार ते १ लक्ष) | ५१ | ४७ | १ | ३१ | ४८ |
| वर्ग ३ (२०हजार ते५०हजार) | २१४ | ११८ | २८ | ५४ | १४६ |
| वर्ग ४ ( ५ हजार ते२०हजार) | १,४०१ | २५८ | २५५ | ८० | ५१३ |
| एकूण | १,६९५ | ४५२ | २८४ | १९२ | ७२६ |

ब्रिटिश हिंदुस्थान व ब्रह्मदेश ह्यांमधील पांच हजारांवरील वस्तीच्या १६९५ शहरांपैकीं ७२६ मध्यें शेड्यूल्ड किंवा बिगर-शेड्यूल्ड बँकांचा व्यवहार चालतो म्हणजे सुमारें निम्म्या शहरांत मुळींच बँक नाहीं. गेल्या डिसेंबर अखेर ब्रिटिश हिंदुस्थानांत ६१ शेड्यूल्ड बँका होत्या आणि बिगर शेड्यूल्ड बँकांची संख्या ६८२ होती. शेड्यूल्ड बँकांच्या शाखा व कचेऱ्या १,१४४ होत्या आणि इतर बँकांच्या बाबतींतला तत्सम आकडा १,०२७ होता. ज्या शहरांत बँका नाहींत तीं बहुतेक सर्व ५० हजारांपेक्षा कमी वसतीचीं आहेत, आणि ५० हजारांपेक्षा अधिक वसतीच्या सर्व शहरांत बँका आहेत. मुलतानी सराफांचें माहेरघर शिकारपूर, भाटपारा व खरगपूर हीं मोठीं शहरें अपवादात्मक आहेत. मोठ्या शहरांतला बँकिंगचा व्यवहार सर्वस्वी शेड्यूल्ड बँकांच्या हातांत आहे आणि लहान शहरें बिगर शेड्यूल्ड बँकांच्या वांटणीस आलीं आहेत. शेड्यूल्ड बँकांच्या शाखांचा विस्तार फार मोठा आहे. ह्या ६१ बँकांचा ४५२ शहरांत व्यवहार चालतो तर ६८२ इतर बँका फक्त ४७६ शहरांत काम करतात. कांहीं शहरांत ह्या दोन वर्गांतील बँकांची परस्परांशीं स्पर्धा चाललेली दिसून येते. मोठ्या शहरांमध्येंहि

लहान बँका शेड्यूल्ड बँकांशीं चढाओढ करतात. वर दिलेल्या तक्त्यावरून असें दिसून येईल कीं ८० मोठ्या शहरांपैकीं ५८ मध्यें अशा प्रकारची चढाओढ आहे. लहान आकाराच्या बँकांस शेड्यूल्ड बँकांशीं टक्कर देणें तीन कारणांनीं शक्य होतें. (१) त्यांचे ठेवींवरील व्याजाचे दर विशेष आकर्षक असतात. (२) त्यांचा व्यवहार मध्यम वर्गांतील गरजू लोकांशीं चालतो आणि अशा गिऱ्हाइकांच्या गरजा त्या भागवतात. (३) त्यांचा लहान आकार कित्येक बाबतींत त्यांस फायदेशीर असतो. लहान शहरांत बिगर शेड्यूल्ड बँकांचें प्राधान्य आहे; तेथें शेड्यूल्ड बँकांनीं आपल्या शाखा काढलेल्या नाहींत. ह्यामुळें तेथें ह्या दोन वर्गांच्या बँकांमध्यें स्पर्धा नाहीं. ही परिस्थिति २८४ शहरांत आहे. परंतु हें येथें लक्षांत ठेवलें पाहिजे कीं ह्या २८४ शहरांपैकीं २५५ शहरें पांच हजार ते वीस हजार वस्तीचीं आहेत. त्यांत व्यापार मर्यादित असून असल्या ठिकाणीं शेड्यूल्ड बँकांस किफायतशीर होईल असा व्यवहार अशक्य आहे. इंडिअन इन्स्टिट्यूट ऑफ बँकर्सच्या नियतकालिकांतील लेखकानें सहकारी अर्बन बँक्स आपल्या विचाराच्या कक्षेबाहेर ठेवल्या आहेत ह्याची येथें आठवण करून देणें आवश्यक आहे. सहकारी बँका मोठ्या शहरांप्रमाणें लहान शहरांमध्यें व्यवहार करीत आहेत. त्यांचें कार्य मर्यादित वस्तीच्या गावांमध्यें चाललें आहे आणि त्या जॉइंट स्टॉक बँकांचे सर्व व्यवहार करतात. आधुनिक पद्धतीच्या बँकिंगचा विचार कर्तव्य असतां आणि त्यापासून विशिष्ट अनुमानें काढावयाचीं असतां सहकारी बँका (सेंट्रल व अर्बन) हिशेबांत घेणें अगत्याचें आहे. असें न झाल्यानें चुकीचीं अनुमानें निघून त्यांपासून भ्रामक समजुती उत्पन्न होण्याची भीति आहे. प्रस्तुत विषयाचें पुढील विवेचन दुसऱ्या लेखांत करूं.

## औद्योगिक बँक—जपानचें उदाहरण

हिंदुस्थानांतील कारखान्यांस लागणारें लांब मुदतीचें भांडवल पुरवणाऱ्या स्वतंत्र औद्योगिक बँका असाव्या अशी सूचना वारंवार करण्यांत येते. तथापि विशिष्ट कारणांमुळें तिला आजवर मूर्त स्वरूप आलेलें नाहीं. खेडेगावी लहान आकाराच्या धंद्यांच्या सोयीसाठी मुंबई सरकारनें एक पंचवीस लक्ष रुपये भांडवलाची बँक स्थापावी असें सर पुरुषोत्तमदास कमिटीनें सुचवल्याचें आम्हीं आमच्या मागील अंकांत सांगितलेंच आहे. फ्रान्समध्यें अशा तऱ्हेचा उपक्रम प्रथम झाला आणि जपानमध्यें ती कल्पना यशस्वी रीतीनें अंमलांत आणली गेली आहे. हिंदुस्थानांत १९१८ मध्यें औद्योगिक कमिशननें उद्योग धंद्यांस भांडवल पुरवणाऱ्या बँकेची शिफारस केल्यापासून ती चर्चेचा विषय झाली. जपाननें आपल्या धंद्यांची उन्नति ज्या मार्गांनी घडवून आणिली ते आदर्श म्हणून स्वतःपुढें ठेवण्याची प्रवृत्ति ह्या देशांत गेल्या पिढीमध्यें दृढमूल झालेली आहे. सेंट्रल बँकिंग इन्क्वायरी कमिटीनें औद्योगिक कमिशनप्रमाणेंच औद्योगिक बँकांचा पुरस्कार केला. जपानमधील औद्योगिक बँकिंगचा इतिहास, त्याची पद्धति इत्यादि बाबतींत सूक्ष्म रीतीनें माहिती काढून तिचा हिंदुस्थानांतील परिस्थितींत प्रत्यक्ष उपयोग करून घेण्याचा प्रयत्न मात्र व्हावा तसा झालेला नाहीं. सुमारें ६०-७० वर्षांमागें जपानमध्यें अमेरिकेच्या धर्तीवर "नॅशनल" बँका स्थापन झाल्या पण पुढें पंचवीस वर्षांनीं त्यांचें रुपांतर सामान्य व्यापारी पद्धतीच्या बँकांत करण्यांत आलें. तथापि, ह्या संस्था स्थावर मिळकतीच्या तारणावर शेतीच्या धंद्यास पैसा पुरवण्याचाच धंदा मुख्यत्वेंकरून करीत असत.

जपानमधील प्रचलित बँकिंगच्या पद्धतीचा उत्पादक प्रिन्स मात्सुकाटा हा होय. भिन्न भिन्न जातींचे व्यवहार करण्यासाठी निरनिराळ्या स्वतंत्र बँका असणें आवश्यक आहे, ह्या तत्त्वाचा तो पुरस्कर्ता होता. प्रथम एक मध्यवर्ती आणि एक्सचेंज बँक स्थापून धंदे व शेती ह्यांस लांब मुदतीचें भांडवल पुरवण्याच्या संस्थांच्या स्थापनेकडे त्यानें आपलें लक्ष वळवलें. चीन-जपान युद्धापूर्वी जपानमध्यें आधुनिक पद्धतीच्या कारखान्यांची प्रगति म्हणण्यासारखी झालेली नव्हती. पण ह्या युद्धांतील विजयामुळें औद्योगिक उन्नतीस चालना मिळाली, नवीन धंदे व कारखाने निघाले आणि त्यांस लांब मुदतीच्या भांडवलाची गरज तीव्रतेनें भासूं लागली. सामान्य व्यापारी बँकांच्या आवाक्याबाहेरची ही गोष्ट होती आणि आपला पैसा धंद्यांत घालण्याची लोकांत प्रवृत्ति उत्पन्न झाली नव्हती. ही उणीव भरून काढण्यासाठी औद्योगिक बँकेची स्थापना करण्यांत आली. इंडस्ट्रिअल बँकेचा कायदा सरकारनें १९०० मध्यें केला आणि त्या बँकेच्या कामास १९०२ मध्यें प्रारंभ झाला. ही बँक संयुक्त भांडवलाची (जॉइंट स्टॉक) संस्था आहे आणि तिचें मूळ भांडवल एक कोटि येन होतें. क्रमाक्रमानें हें भांडवल वाढवण्यांत आलें आणि १९१९ मध्यें तें ५ कोटि येन झालें. १९२२ मध्यें हें भागांचें सर्व भांडवल भरलें गेलें. जपानच्या सरकारनें स्वतःचें भांडवल मुळींच घातलेलें नाहीं. सरकारी तिजोरींतल्या ठेवींमधून अल्प व्याजानें ह्या बँकेस पैसा मात्र पुरवला जातो. पोस्टल सेव्हिंग बँकांमधील ठेवी सरकारच्या फडणवीशी खात्याकडे असतात त्यांतून वाटेल तेवढें भांडवल सवलतीनें औद्योगिक बँकेस देण्यांत येतें. सुरक्षित आणि फायदेशीर रीतीनें सरकारी तिजोरीतील ठेवींचा पैसा गुंतवावा असा कायदा आहे आणि त्यास अनुसरून औद्योगिक बँकेस भांडवल दिलें जातें.

### हिंदी कापडाच्या निर्गतीस उत्तेजन

युद्धामुळें पाश्चात्य देशांचा पूर्वेकडील देशांशीं होणारा व्यापार मंदावला असल्यानें हिंदी गिरण्यांच्या कापडास मलाया, डच ईस्ट इंडीज, ऑस्ट्रेलिया, पूर्व व पश्चिम आफ्रिका आणि इजिप्त इत्यादि देशांतून चांगली मागणी येत आहे. हिंदुस्थानच्या कापडाच्या व सुताच्या निर्गत व्यापाराची बढती होण्याचीं स्पष्ट चिन्हें दिसत आहेत.

### बुडालेल्या बँका

१९३१ ते १९३६ ह्या मुदतींत हिंदुस्थानांतील २२७ बँका बुडाल्या. त्यांचें भरणा झालेलें भांडवल १ कोटि, २ लक्ष रुपये होतें. १९१८ ते १९२५ ह्या मुदतींत ५ कोटि १२ लक्ष रुपये भरणा झालेलें भांडवल असलेल्या ९१ बँका बुडाल्या होत्या. १९३८ सालीं त्रावणकोर संस्थानांतील ४० बँका बुडाल्या.

# स्फुट विचार

## ब्रिटिश युद्ध बजेट

आधुनिक युद्धें बेसुमार खर्चाचीं होऊन गेलीं असून जर्मनी-सारख्या प्रतिस्पर्ध्याशीं प्रसंग असल्यानें ग्रेट ब्रिटनला पाण्यासारखा पैसा ओतावा लागत आहे. परंतु युद्ध खर्चात कितीहि योग्य वाटणारी काटकसर केली तरी आवश्यक असलेला खर्च करण्यास त्या राष्ट्रानें मार्गेपुढें न पहाणें अगत्याचें आहे. ह्या गोष्टीची जाणीव जशी ब्रिटिश सरकारास आहे तशीच ती ब्रिटिश जनतेसहि आहे हें समाधानकारक आहे. गेल्या आठवड्यांत सर जॉन सायमन ह्यांनीं कॉमन्स सभेत आपलें युद्ध-बजेट सादर केलें तेव्हां इंग्लंडला येत्या वर्षी २६६ कोटि पौंडांचा एकूण खर्च करावा लागेल आणि त्यापैकी निवळ युद्धाप्रीत्यर्थ २०० कोटि पौंड खर्ची पडतील असें त्यांनीं सांगितलें. ह्या प्रचंड रकमेपैकीं शक्य तेवढा मोठा भाग कर्जाच्या स्वरूपांत उभा करण्यांत यावयाचा असल्यानें ब्रिटिश जनतेस सरकारी देण्याचा अवजड बोजा सहन करावा लागणार आहे. ह्यासाठीं चालू करांत थोडी थोडी वाढ करण्यांत येणार असून कांहीं नवे कर बसवण्यांत यावयाचे आहेत. प्राप्तीवरील करांचा दर चढवण्यांत येईल आणि तंबाखू, दारु, काड्याच्या पेट्या, पोस्ट, तार व टेलिफोन ह्यांच्यावर जादा देणें लादलें जाईल. सर जॉन सायमन ह्यांनीं एक नवा कर बसवण्याचें योजलें आहे आणि तो मालाच्या घाऊक खरेदीवर (खाण्याचे जिन्नस वगळून) आकारण्यांत येणारी पट्टी हा होय. ब्रिटिश फडनवीसांच्या अंदाजपत्रकांतील विशिष्ट योजनांवर इंग्लंडमध्यें प्रतिकूल टीका होत असली तरी त्यांच्या बजेटाचें एकंदरींत स्वागतच करण्यांत येत आहे असें म्हणावयास हरकत नाहीं. युद्धांत विजय मिळवण्यासाठीं इंग्लंड आपली शिकस्त करीत आहे आणि त्याकरितां आवश्यक असलेला सर्व प्रकारचा स्वार्थत्याग करण्यास ब्रिटिश जनतेनें तयार असलें पाहिजे. सर जॉन सायमन ह्यांच्या बजेटाची आणि ब्रिटिश वृत्तपत्रांची हीच भूमिका आहे. फडनविसांनीं लोकांवर अधिक बोजा टाकला असता तरी तें समर्थनीय झालें असतें, इतकेंच नव्हे, तर त्यांनीं तसें करावयास हवें होतें असेंहि कांहीं टीकाकारांचें म्हणणें आहे.

---

## लोकलबोर्ड्स आणि प्राथमिक शिक्षणाचा खर्च

ह्या प्रांतांतील कित्येक लोकलबोर्डांनीं सरकारच्या द्रव्यसहायाचे अभावीं आपणांस प्राथमिक शाळा बंद कराव्या लागत असल्याविषयीं तक्रार केली आहे. तिला उत्तर देतांना मुंबई सरकारानें आपल्या खुलाशांत म्हटलें आहे कीं, प्राथमिक शिक्षणाच्या प्रसारावरच्या आपण मंजूर केलेल्या खर्चास सहाय देणें एवढेंच आपणांस बंधनकारक असून मंजुरीबाहेर केलेल्या खर्चास लोकलबोर्ड्स जबाबदार आहेत. १९२३ सालीं प्राथमिक शिक्षणाचा ताबा बोर्डांकडे गेला तेव्हां मंजूर केलेल्या शिक्षणावरील खर्चासाठीं ग्रँट्स देण्याचें सरकारनें मान्य केलें. सक्तीच्या शिक्षणाचे संबंधांत सरकारनें मंजूर केलेल्या योजनांचे बाबतींत जादा खर्चाचा निम्मा भाग म्युनिसिपालिट्यांस आणि दोनतृतियांश लोकलबोर्डांस ग्रँट्स म्हणून देण्याची तरतूद कायद्यानेंच केलेली आहे. बिनसक्तीच्या शिक्षणास द्रव्यसहाय विशिष्ट प्रमाणांत देण्यास सरकार मुळींच बांधलेलें नाहीं आणि वेळोवेळ सांपत्तिक परिस्थितीस अनुसरून त्या विषयींच्या ग्रँट्स कमी-अधिक झालेल्या आहेत. १९३० मध्यें पैशाच्या टंचाईमुळें शिक्षणाच्या प्रसारास सहाय देण्यास आपण असमर्थ आहों असें सरकारनें लोकलबोर्डांस कळवलें आणि पुढच्या सालीं ग्रँट्सना कपात लागू केली. १९३८ मध्यें सांपत्तिक स्थिति थोडी सुधारल्याकारणानें सरकारनें मान्य केलेल्या शिक्षण विषयक खर्चासाठीं ग्रँट्स देण्याचें ठरवलें. ह्या जादा ग्रँट्सचा विनियोग सर्वस्वी शिक्षणाच्या प्रसाराकडे व्हावा असा मात्र सरकारचा आग्रह होता. ह्या बदललेल्या धोरणामुळें लोकलबोर्डांच्या सरकारमान्य प्राथमिक शिक्षणाच्या खर्चाचा सरकारचा अंश १९३७ मध्यें ७७½ टक्के होता तो १९३८ मध्यें ८४ टक्के झाला.

---

## लोकलबोर्डांची जबाबदारी व सरकार

कांहीं लोकलबोर्ड्स कित्येक शाळा बंद करण्याच्या आणि शिक्षकांस घरीं बसावयास सांगण्याच्या विचारांत आहेत. ह्या गोष्टीचा मुंबई सरकारनें विचार केला असून त्यासंबंधानें त्याचें असें म्हणणें आहे कीं, प्राथमिक शिक्षणाचा प्रसार कांहीं जिल्ह्यांमध्यें बिनहिशेबी रीतीनें हातीं घेण्यांत आलेला आहे आणि त्यास लागणाऱ्या पैशाची तजवीज लक्षांत घेण्यांत आलेली नाहीं. शिक्षणप्रसाराची इष्टता निर्विवाद असली तरी प्रगति पैशावर अवलंबून रहाणें अपरिहार्य आहे हें विसरून चालावयाचें नाहीं. कांहीं जिल्ह्यांत उत्पन्नाच्या मानानें कायमचा खर्च प्रमाणाबाहेर अंगावर घेतला गेला आहे आणि तो मागील वर्षांच्या शिलकेमधूनहि भागवलेला आहे. ह्या धोरणाचा असा परिणाम झाला आहे कीं, उत्पन्न वाढवणें किंवा शिक्षणाची प्रगति थांबवणें ह्यांपैकीं एक गोष्ट अपरिहार्य झाली आहे. कांहीं जिल्ह्यांत लोकल बोर्डांनीं आपल्या स्कूल बोर्डांस अपुऱ्या ग्रँट्स दिल्या आहेत आणि प्राथमिक शिक्षणासाठीं उभा केलेला पैसा इतर कामावर खर्चण्यांत आला आहे. एका जिल्ह्यांत तर लोकल फंड सेसच्या २४ पैंमधून १६ पै शिक्षणावर खर्चल्या जावयास हव्या असतां १९३३ मध्यें तें प्रमाण ८ पैवर खालीं आलें. ह्या सर्व गोष्टी लक्षांत घेऊन सरकारचा असा निष्कर्ष आहे कीं त्याच्या संमतीशिवाय बोर्डांनीं चालू केलेल्या खर्चास ग्रँट देण्यास तें बांधलेलें नाहीं आणि हें धोरण त्या संस्थांस स्पष्ट रीतीनें कळवण्यांत आलेलें होतें. सरकारची मदत मिळेल ह्या अपेक्षेनें ज्यांनीं आपला शिक्षणाचा खर्च वाढवला आहे त्या बोर्डांनीं त्याची नैतिक जबाबदारी स्वीकारली आहे. ती ओळखून अतित्वांत आहेत त्या शाळा चालू ठेवण्याची काळजी लोकल बोर्ड्स घेतील अशी आशा सरकारनें प्रकट केली आहे. ह्या कामीं शक्य झाल्यास कांहीं मदत सरकार देईल, पण मुख्य जबाबदारी बोर्डांची असून त्यांनीं ती पार पाडली पाहिजे असें सरकारचें म्हणणें आहे.

---

## लोकशिक्षण आणि ग्रंथालयें

जनतेमध्यें शिक्षणाचा सार्वत्रिक प्रसार करण्याचें काम मुंबई सरकारनें अलीकडे हातीं घेतलें आहे. प्रौढ शिक्षणाच्या प्रसारासहि उत्तेजन देण्यांत येत आहे. लोकांस अक्षर ओळख झाली किंवा लिहिण्यावाचण्याचें शिक्षण मिळालें तरी तेवढ्यानें कार्यभाग होत नाहीं. त्यांचेंमध्यें ज्ञानाविषयीं आस्था व वाचनाची गोडी निर्माण होणें आवश्यक असतें आणि ती इच्छा तृप्त होण्याची त्यांची सोय करून देणें आवश्यक होतें. ह्यासाठीं पुस्तकालयांची तजवीज करणें क्रमप्राप्तच आहे. नुसती निरक्षरता नाहींशी

होण्यानें शिक्षणाचा मुख्य हेतु साध्य होत नाहीं. लोकांस वाचण्यासाठीं पुस्तकें सहज उपलब्ध झालीं पाहिजेत. ही मूलभूत गोष्ट लक्षांत घेऊन मुंबई सरकारनें पुस्तकालयें ठिकठिकाणीं स्थापण्याची चळवळ हातीं घेण्याचें ठरविलें आहे. प्रांतभर वाचनालयांचें जाळें पसरून मध्यवर्ती व स्थानिक ग्रंथसंग्रहांची सांगड घालून देण्याचा त्यांचा विचार आहे. हा हेतु सफल व्हावा म्हणून त्यांस पुस्तकालयांची एक योजना निश्चित करावी लागेल आणि ह्याकरितां सरकारनें सरकारी लॉ कॉलेजचे प्रिन्सिपॉल, मि. फैजी, ह्यांच्या अध्यक्षतेखालीं एक कमिटी नेमली आहे. ह्या कमिटीनें एक प्रश्नमालिका तयार केली असून लोकांनीं तिला माहिती पुरवून व सूचना करून सहाय करावें अशी तिची अपेक्षा आहे. पुणें, अहमदाबाद व धारवाड येथें प्रादेशिक ग्रंथालयें आणि मुंबई शहरांत एक मध्यवर्ती ग्रंथालय स्थापण्याचा सरकारचा विचार आहे. ह्या मुख्य कल्पनेस मूर्त स्वरूप देण्यास जागा, पुस्तकें, पैसा, ग्रंथालयांचे परस्पर संबंध इत्यादि विषयींच्या महत्वाच्या तपशीलाच्या बाबींविषयीं चर्चा व निर्णय करावा लागेल.

### मुंबई प्रांतांतील कामगार संघ

ह्या प्रांतांत कामगार संघांबाबतचा अखिल भारतीय कायदा अंमलांत आहे. त्याच्या अंमलबजावणीचा १९३८-३९ चा वृत्तांत प्रसिद्ध झाला आहे, त्यावरून अशी माहिती मिळते कीं, ह्या वर्षाच्या प्रारंभीं रजिस्टर झालेले व न झालेले असे मिळून १२६ संघ अस्तित्वांत होते आणि त्यांच्या सभासदांची संख्या १ लक्ष, ८ हजार होती. ह्या १२६ संस्थांपैकी ५१ कायद्याप्रमाणें रजिस्टर झालेल्या होत्या आणि ३१ पोस्ट व टेलिग्राफ खात्याच्या कारकुनी पेशाच्या नोकरांच्या होत्या. १९३८–३९ चे आरंभीं ५१ संघ रजिस्टर्ड होते आणि त्या सालांत १३ संघांची भर पडली, ३ संघांचें रजिस्ट्रेशन रद्द झालें व ८ संघांवरचा अधिकार कायद्याप्रमाणें मध्यवर्ती सरकाराकडे वर्ग करण्यांत आला. एप्रिल १९३९ च्या पहिल्या तारखेस पटावर ह्याप्रमाणें ५३ संघ राहिले. आपला वृत्तांत अधिकाऱ्यांस सादर करणाऱ्या संघांतील सभासदांची संख्या सुमारें ४ टक्क्यांनीं वाढून जवळ जवळ ५१ हजार झाली. ट्राम्वे संघाच्या संघांत संख्या २९४ टक्के वाढली. म्युनिसिपल नोकर, छापखान्यांतले कामगार व खलाशी ह्यांच्या संघांतहि चांगली वाढ झाली. कित्येक संघांच्या ही सभासदांची संख्या सारखी कमी होत आली आहे. मुंबईमधील गिरणी कामगार संघाची नोंद रद्द झाली आणि गोकाक मिल्स मधील संघ वगळला गेला ह्या कारणानेंच मुख्यत्वेंकरून ही घट झाली आहे. संघांच्या ताळेबंदीकडे पाहिलें असतां असें दिसतें कीं, त्यांचें देणें व घेणें प्रत्येकी वीस लक्ष रुपये होतें. सुमारें अर्धालक्ष रुपये पडलेल्या वर्गणीचे असून त्याच्या आकड्याचा अंतर्भाव देण्यांत केलेला आहे. रेल्वे कामगारांच्या संघांचे रोखीच्या जमेचे आकडे मोठे आहेत, पण हे संघ मध्यवर्ती सरकारच्या बाबींत गेले आहेत आणि त्यांच्या खालोखाल पोर्टट्रस्ट व गोद्यांतील कामगारांच्या संघांची सांपत्तिक स्थिति बरी आहे. अहमदाबादच्या कापडाच्या गिरण्यांतील कामगारांच्या संघाचा मध्यवर्ती संघाच्या जमा-खर्चाचे आकडे मोठे आहेत. ह्या फेडरेशननें सहा हजार रुपये संपावर खर्च केले पण आठेचाळीस हजार रुपये शिक्षण व धर्मादाय ह्यांवर खर्चले.

### हेर रिबेनट्रॉपचें लंगडें समर्थन

जर्मनीनें बरेच दिवस तयारी करून आपल्या फौजा नॉर्वेमध्यें पाठवल्या आणि त्यांनीं महत्त्वाचीं ठिकाणें आपल्या ताब्यांत घेतलीं. नॉर्वेची राजधानी ऑस्लो शहर जर्मनांच्या हातीं सहज पडलें आणि त्यांस दुसऱ्या ठिकाणींहि विरोध झाला नाहीं, ह्यावरून सरळ अनुमान निघतें कीं, जर्मनीनें त्या देशावर स्वारी करण्याची योजना पूर्वी ठरल्याप्रमाणें व्यवस्थितपणानें अंमलांत आणली हेर फॉन रिबेनट्रॉप ह्यांनीं नुकतेंच एक महत्त्वाचें भाषण करून त्यांत जर्मनीच्या नॉर्वेवरील स्वारीचें समर्थन केलें. जर्मनीचा इंग्लंडवर असा आरोप आहे कीं, नॉर्वेचा तटस्थपणा धुडकावून लावण्याचा ब्रिटिश मुत्सद्यांचा बेत कित्येक आठवडे चालला होता आणि तो हाणून पाडण्यासाठीं जर्मनीस आपलीं सैन्यें नॉर्वेमध्यें पाठवणें भाग पडलें. ह्या कटांत नॉर्वेचे राज्यकर्ते सामील झाले असल्याचा आरोप बेमुरवतपणानें रिबेनट्रॉप ह्यांनीं केला आहे. पश्चिम रणांगणावर लढाईला तोंड लागत नाहीं असें पाहून मि. चर्चिल सारखे ब्रिटिश मुत्सद्दी निराश झाले आणि त्यांनीं नॉर्वे व डेन्मार्क ह्यांसारख्या तटस्थ राष्ट्रांस युद्धांत ओढण्याचा व्यूह रचला. त्याला नॉर्वे बळी पडून ब्रिटिश फौजा त्या देशांत उतरण्याची सर्व तयारी झाली. हा डाव यशस्वी न होऊं देणें हें जर्मनीचें कर्तव्यच होतें. ह्या आशयाचें रिबेनट्रॉप ह्यांचें समर्थन आहे. त्याचा फोलपणा इतका उघड आहे कीं, जगाच्या डोळ्यांत धूळ फेकण्याचा असला पोरकट यत्न जर्मनीनें करावा हें आश्चर्य आहे. पण त्यांत एका दृष्टीनें पाहतां आश्चर्यहि नाहीं. शेजारच्या स्वतंत्र देशांत फंदफितुरी करून कोणत्याहि सबबीवर त्याच्याशीं भांडण काढावयाचें आणि त्यावर स्वारी करून त्याच्या स्वातंत्र्याचें हरण करावयाचें हा जर्मनीचा ठरलेला खाक्या झाला आहे. इंग्लंडचा नॉर्वेत सैन्य पाठवण्याचा पूर्वीपासून बेत असता तर त्यास तसें करण्यास उशीर होऊन नाना प्रकारांच्या अडचणीस तोंड कां द्यावें लागलें असतें तसेंच, नॉर्वेच्या सरकारचें इंग्लंडशीं संगनमत असतें तर तें बेसावध राहून जर्मनीच्या फौजांस झपाट्यानें उत्तरेकडे चालून जाण्यास संधि कशी मिळती? पश्चिम किनाऱ्यावर ठिकठिकाणीं आपल्या फौजा उतरून जर्मन सैन्याचा प्रतिकार करण्यास नॉर्वेच्या सरकारास मदत देण्याचे कामीं ब्रिटिशांस अडचण भासली आहे हें कशाचें द्योतक आहे? त्यांच्या पूर्वतयारीचें आणि कटाचें कीं नॉर्वेच्या तटस्थपणास बाध दिल्याचें? फिन्लंडच्या सहायास आपल्या फौजा पाठवण्याचा आपला हेतु ब्रिटिश व फ्रेंच सरकारोंनीं उघड रीतीनें प्रसिद्ध केला होता; पण त्यावेळीं दोस्त राष्ट्रांच्या फौजांस आपल्या मुलखांतून जाऊं देण्यास नॉर्वेच्या सरकारनें स्पष्ट नकार दिलेला होता, ह्या गोष्टीचें येथें विस्मरण होऊं देऊन चालावयाचें नाहीं. नॉर्वेमध्यें अगोदर अन्यायानें शिरून त्यांतल्या राष्ट्र भाग बळकावून बसावयाचें आणि ह्या दांडगाईचा प्रतिकार करण्यास इंग्लंड व फ्रान्स ह्यांनीं आपलीं सैन्यें मागाहून पाठवलीं तर त्याविरुद्ध तक्रार करावयाची हें जर्मन मुत्सद्यांसच शोभतें. हेर फॉन रिबेनट्रॉप ह्यांच्या भाषणानें तटस्थ राष्ट्रें फसणें शक्य नाहीं. नॉर्वे हा देश तूर्त युद्धाचें मुख्य क्षेत्र बनलें असून त्या ठिकाणीं दोस्तराष्ट्रांस आपलें शक्तिसर्वस्व एकवटलें पाहिजे. पूर्वतयारी व्यवस्थित रीतीनें केल्यामुळें जर्मनीची नॉर्वेतील परिस्थिति प्रारंभीं अनुकूल असणें स्वाभाविक आहे. परंतु दोस्त राष्ट्रांच्या फौजा अधिकाधिक नॉर्वेमध्यें उतरून पुढें चालून जातील तसतसी ही परिस्थिति बदलेल आणि जर्मनीची प्रगति बंद होऊन त्यास स्वतःच्या संरक्षणाचीच काळजी पडेल.

## ईस्टर्न बँकेच्या अध्यक्षांचें भाषण

### युद्धाचा हिंदुस्थानवर परिणाम

ईस्टर्न बँक ही एक एक्स्चेंज बँक असून तिचा हिंदुस्थानांत शाखेमार्फत व्यवहार चालतो. ह्या बँकेच्या वार्षिक सभेचे प्रसंगीं तिच्या अध्यक्षांनीं ह्या देशांतील आर्थिक परिस्थितीवर युद्धामुळें झालेल्या परिणामांचा उल्लेख केला. सर जेम्स ले-वुड ह्यांच्या ह्या विषयाबाबतच्या उद्गारांचा गोषवारा येथें आम्ही देत आहों:—

"१९३९ सालाच्या पहिल्या सहामाहींत हिंदुस्थानाच्या परराष्ट्रीय व्यापाराच्या आढाव्यांत देण्यापेक्षा येणें ५½ कोटि रुपयांनीं अधिक होतें; दुसऱ्या सहामाहींत हा आकडा ४६ कोटि रुपयांचे वर गेला. ह्या गोष्टीचा परिणाम परराष्ट्रीय हुंडणावळींत रुपयाच्या चलनास मजबुती येण्यांत दिसून आला आणि रिझर्व्ह बँकेस ६½ कोटि पौंडांच्या हुंड्या विकत घेतां आल्या. हिंदुस्थान सरकारचें इंग्लंडमध्यें द्यावयाचें देणें भागवून ह्या हुंड्यांच्या रकमेचा मोठा भाग शिल्लक राहिला आणि त्या शिलकेचा उपयोग लंडनमधील चलन निधींत ११ कोटि पौंडांच्यावर भर टाकण्याकडे करण्यांत आला. चलननिधींतल्या ह्या वाढाव्याचे तारणावर हिंदुस्थानांत चलनाच्या विस्तार करण्यांत आल्यानें युद्धाचे प्रारंभीं इंग्लंडमधील बँक रेट वाढवावा लागला तेव्हां येथें तसें करण्याची आवश्यकता भासली नाहीं. हिंदी चलन व हुंडणावळ ह्यांची व्यवस्था मोठ्या कुशलतेनें केल्याबद्दल रिझर्व्ह बँकेचें अभिनंदन करणें आवश्यक आहे.

गेल्या वर्षाच्या पहिल्या आठ महिन्यांत बाजारभाव फार खालीं गेलेले होते, परंतु युद्ध चालू होतांच ते बेसुमार चढले आणि हळूहळू उतरले. किंमती एकाएकी चढणें धोक्याचें असतें आणि म्हणून आमच्या बँकेच्या मॅनेजरांस अत्यंत सावधगिरीनें वागण्याची सूचना देण्यांत आली आहे. युद्धपरिस्थितीचा फायदा सर्व मोठ्या धंद्यांस मिळणार आहे असें सामान्यतः म्हणण्यास हरकत नाहीं. गोणपाटाला ब्रिटिश सरकारची मोठी मागणी असल्यानें तागाच्या गिरण्यांस चांगला नफा होईल. हिंदुस्थानचा निर्गत व्यापार वाढला तरी त्याचा फायदा एक्सचेंज बँकांस सामान्य कल्पनेप्रमाणें मिळणार नाहीं. कारण, चहा व तागाचा माल ह्यांची खरेदी सरकारच्या वतीनें होत असल्यानें खासगी व्यापाराप्रमाणें त्यांत हुंड्यांचा व्यवहार व्हावयाचा नाहीं. आधुनिक पद्धतीच्या व्यापारी बँकांची वाढ अलीकडे झपाट्यानें होत असून तिच्या योगानें कित्येक अवघड प्रश्न उपस्थित झाले आहेत आणि जनतेच्या हिताच्या रक्षणासाठीं व सामान्य हिंदी बँकांस सुरक्षितपणा प्राप्त व्हावा म्हणून त्या संबंधांत स्वतंत्र कायद्याविषयीं रिझर्व्ह बँकेनें सूचना केल्या आहेत."

### "मी"

राष्ट्रीय पुढाऱ्यांच्या भाषणांत "मी" हा शब्द सरासरीनें किती वेळां येतो, ह्याचा हिशेब एकानें केला आहे. ब्रिटिश मुख्य प्रधान २५० शब्दांत एकदां "मी"चा उच्चार करतात, दलादियेच्या २३४ शब्दांत "मी" एक वेळ येतो, रुझवेल्टच्या भाषणांत १०० शब्दांस १ "मी" असें प्रमाण पडतें, तर मुसोलिनीच्या प्रत्येक ८१ शब्दांत एक "मी" असतो. हिटलरच्या बाबतींत ही सरासरी ५४:१ अशी आहे.


मुंबई इलाख्यांतील सहकारी चळवळीच्या केंद्रस्थानीं असलेली

# शेतकऱ्यांची प्रांतिक बँक

म्हणजेच

## बॉम्बे प्रॉव्हिन्शियल् को-ऑपरेटिव् बँक, लिमिटेड.

( सहकारी कायद्यान्वयें नोंदलेली )

स्थापना १९११.

मुख्य कचेरी—सर विठ्ठलदास ठाकरसी मेमोरिअल बिल्डिंग ९, बेक हाउस लेन, कोट मुंबई.

शाखा

| | |
|---|---|
| १ बारामती ( जि. पुणें ) | १६ अकलूज ( जि. सोलापूर ) |
| २ सातारा ( „ सातारा ) | १७ विरमगांव ( „ अहमदाबाद ) |
| ३ इस्लामपूर ( „ „ ) | १८ धुळें ( „ प. खानदेश ) |
| ४ कऱ्हाड ( „ „ ) | १९ दोंडाईचें ( „ „ ) |
| ५ तासगांव ( „ „ ) | २० शिरपूर ( „ „ ) |
| ६ किर्लोस्करवाडी ( „ „ ) | २१ शहादें ( „ „ ) |
| ७ शिराळें ( „ „ ) | २२ नंदुरबार ( „ „ ) |
| ८ कोरेगांव ( „ „ ) | २३ साक्री ( „ „ ) |
| ९ वाई ( „ „ ) | २४ शिंदखेडें ( „ „ ) |
| १० अहमदनगर ( „ अहमदनगर ) | २५ तळोदें ( „ „ ) |
| ११ शेवगांव „ „ ) | २६ मालेगांव ( „ नाशिक ) |
| १२ कोपरगांव ( „ „ ) | २७ सटाणा ( „ „ ) |
| १३ भिवंडी ( „ ठाणें ) | २८ कळवण ( „ „ ) |
| १४ पालघर ( „ „ ) | २९ दोहद ( „ पंचमहाल ) |
| १५ कल्याण ( „ „ ) | ३० कालोला ( „ „ ) |

## खेळतें भांडवल रु. २०००००००चे वर

या बँकेंत मुदतीच्या, चालू व सेव्हिंग बँक ठेवी स्वीकारल्या जातात

आणि

इलाख्यांतील बहुतेक सर्व प्रमुख ठिकाणीं हुंडीचा व्यवहार केला जातो.

या बँकेंत येणारा पैसा, शेतकरी व इतर अल्प उत्पन्नाचे लोक, यांच्या प्रत्यक्षपणें उपयोगी पडतो.

पूर्ण माहितीकरितां हेडऑफिस अगर शाखा-कचेऱ्यांस लिहा.

व्ही. एल्. मेहता,
मॅनेजिंग डायरेक्टर.

### दि सांगली बँक लि., सांगली

गेल्या नोव्हेंबरमध्यें पुऱ्या झालेल्या वर्षाबाबतचा सांगली बँकेच्या डायरेक्टरांचा वृत्तांत आणि ताळेबंद व नफा–तोटा-पत्रक हीं आमचेकडे आलीं आहेत. तीं पहातां बँकेचा व्यवहार सुव्यवस्थित आणि प्रगतिपर रीतीनें चालला असून तिचे निधीहि भक्कम करण्यांत येत आहेत, असें दिसून येतें. वृत्तांताचे वर्षी बँकेचा नफा ३२,६८९ रुपये इतका होता, त्यापैकीं १८,६२९ इतकी एकूण रकम निरनिराळ्या फंडांत टाकण्यांत आली आहे. कर्जरोख्यांच्या किंमती उतरल्या कारणानें इन्व्हेस्टमेंट ईकलायझेशन फंड मजबूत करण्याचें डायरेक्टरांचें धोरण अभिनंदनीय आहे. भागीदारांस ७ टक्के डिव्हिडंड वाटण्यांत आलें आहे. बँकेचें भरलेलें भांडवल २ लक्ष रुपये आहे आणि निरनिराळ्या फंडांत एकूण सुमारें १ लक्ष ४० हजार रुपये आतां जमा झाले आहेत. एकूण ठेवींची रकम जवळ जवळ १९ लक्ष रुपये आहे. त्यांत मुदतीच्या ठेवी ६ लक्ष, ९० हजार आहेत आणि सेव्हिंग्ज खात्यावर ५ लक्ष, ९४ हजार रुपये आहेत. एकूण खेळत्या भांडवलाचा आकडा २२ लक्ष, ८५ हजार रुपये इतका आहे. जवळील आणि बँकांमध्यें असलेली एकूण शिल्लक ६ लक्ष, ६३ हजार रुपये आहे आणि कर्जरोख्यांत १० लक्ष, ७७ हजार रुपये गुंतवलेले आहेत. ह्या दोन्ही रकमांचें एकूण खेळत्या भांडवलाशीं पडणारें प्रमाण समाधानकारक असून "फ्लुइड रिसोर्स" ची तरतूद चांगली आहे. कर्जाऊ दिलेल्या रकमांची एकूण बेरीज ४ लक्ष, ३९ हजार रुपये आहे आणि त्यांत सोन्याच्या गहाणावर दिलेली रकम १ लक्ष, ९३ हजार रुपये आहे. मालगहाणावर १ लक्ष, ४२ हजार रुपये दिलेले आहेत. बुडीत व संशयित येण्याचा आकडा ५४ हजार रुपये असून तो किंचित् मोठा दिसतो. त्यासाठी २३ हजार रुपयांची तरतूद बँकेनें केलेली आहे. वरील ५४ हजारांशिवाय २४ हजार रुपयांचें निराळें एक संशयित येणें आहे. बुडीत व संशयित कर्जासाठी तरतूद अधिक सढळ हातानें करण्याची आवश्यकता ह्यावरून सूचित होते. बँकेच्या सहा ठिकाणीं शाखा आहेत आणि आणखी दोन शाखा काढण्याचा डायरेक्टरांचा विचार आहे.

---

### बॉम्बे टॉकीज कंपनीस ७० हजार रुपये नफा

गेल्या ऑक्टोबर असेरच्या वर्षांत बॉंबे टॉकीज ह्या चित्रपट कंपनीस ७० हजार रुपये नफा झाला.

### ग्रेटब्रिटनचें अवाढव्य राष्ट्रीय कर्ज

गेल्या मार्चअसेर ब्रिटिश राजकीय कर्जाचा आकडा ८९२ कोटि पौंडांवर ( सुमारें ११,९१० कोटि रुपये ) गेला.

### ट्रेझरी बिलांवर द. सा. द. शे. १ रु. ५ आ. ५ पै व्याज

एक कोटी रुपये किंमतीच्या हिंदुस्थान सरकारच्या ट्रेझरी बिलांस ४ कोटी ९९ लक्ष रुपयांची मागणी गेल्या आठवड्यांत आली होती. एक कोटि रुपयांचीं टेंडरें स्वीकारण्यांत येऊन त्यांवर सरासरीचा व्याजाचा दर द. सा. द. शे. १ रु. ५ आ. ५ पै इतका पडला.

### गुळाची प्रत लावण्याचा उपक्रम

शेतीच्या मालाची अधिकारयुक्त रीतीनें प्रत लावण्याचें ( ग्रेडिंग ) चें काम हिंदुस्थान सरकारच्या त्या बाबतीतल्या कायद्यास अनुसरून चाललें आहे. गुळाची प्रत शास्त्रीय पद्धतीनें निश्चित करण्याविषयींचें मद्रास इलाख्यांतलें कार्य कोइमतूर येथें चालू झालें आहे.


स्पृहणीय यश

बोनसचे दरांत २० टक्के वाढ

तारीख ३० एप्रिल १९३८ रोजीं झालेल्या मूल्यमापनाचा निकाल.

| हयातीनंतरचे विम्यावर | त्रैवार्षिक–दर हजारीं बोनस | हयातींतील विम्यावर |
| --- | --- | --- |
| रु. ५४ | | रु. ४५ |

आजच "कॉमनवेल्थ" ची पॉलिसी घेऊन कंपनीचे उत्कर्षांत भागीदार व्हा.

दि कॉमनवेल्थ ॲशुअरन्स

कंपनी लि० पुणें

लिहा अगर समक्ष भेटा.

श्री. रा. न. अभ्यंकर, बी. ए., एलएल. बी.

मॅनेजिंग एजंट.

सर्वत्र कार्यक्षम व विश्वासू एजन्ट आकर्षक अटींवर नेमणें आहेत.

रूरल प्रॉडक्टस् कं. लि. चे

★ संत्रा ड्रिंक ★ जांभळाचा रस

★ जांभळाच्या बियाची पूड ★ इतर रस व पेयें

सर्व मोठ्या व महत्त्वाच्या ठिकाणीं विकण्यासाठीं जबाबदार प्रतिनिधि पाहिजेत.

रजिस्टर्ड ऑफिस: ७५४ शुक्रवार, पुणें २ | बिझिनेस ऑफिस: ९१९A सदाशिव, पुणें २

न. गं. आपटे, बी. एजी., एम्. एस्सी.

S. B. JOSHI & Co.

ENGINEERS & CONTRACTORS

Examiner Press Building, Dalal Street, Bombay | 716 Sadashiv Peth, Poona City

K. K. & Co.

Photographic Dealers

POONA.

'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार

२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक

३ व्यापारी उलाढाली

## " यावत्तैलम् तावदाख्यानम् "

रुमानियांतून, विशेषत: रशियाच्या बाजूनें, जळाऊ तेलाचा पुरवठा आपणांस होईल ही जर्मनीची आशा सफल होत नसल्यानें ह्या देशाच्या सूत्रधारांमध्यें निराशा पसरल्याची बातमी प्रसिद्ध झाली. तेलाच्या पुरवठ्याचे संबंधांत आपणांस रशियाचें भरपूर सहाय मिळेल अशी जर्मनीची अपेक्षा होती. राकेल तेलाचा पुरवठा भरपूर असण्याचें महत्त्व चालू युद्धांत किती जिव्हाळ्याचें आहे ह्याची योग्य कल्पना येणें अगत्याचें आहे. जमिनीवरील, पाण्यांतील, व हवेमधील लढवय्यांच्या सर्व हालचाली आतां यंत्रसहायानें होतात आणि तेल हा ह्या सर्व यंत्रसामुग्रीचा प्राण आहे. ज्या कोणास आधुनिक पद्धतीनें लढावयाचें आहे, त्यानें तेलाची व्यवस्था नीट केली पाहिजे. लढण्याच्या जुन्या पद्धति आतां कुचकामाच्या आणि म्हणून रद्द झाल्या आहेत.

गेल्या महायुद्धांत यंत्रयुगास नुकताच प्रारंभ झालेला होता तरीहि दोस्त राष्ट्रांच्या बाजूनें त्याचा प्रभाव दिसून आलाच. 'टँक्स' १९१७ मध्यें पहिल्यांदा उपयोगांत आलीं. त्यावेळीं आकाशयानांनीं फारशी प्रगति केलेली नव्हती. जर्मनीचीं लढाऊ विमानें १९१६ चे अखेर आणि ब्रिटिशांचीं १९१८ मध्यें उड्डाणें करूं लागलीं. गेल्या वीस वर्षांत ह्या परिस्थितींत विलक्षण क्रांति घडून आली आहे. घोडदळ व पायदळ आतां यंत्रमय बनलीं आहेत. ब्रिटिश चिलखती गाड्या ( टँक्स ) हीं प्रचंड प्रकरणें आहेत. त्यांच्याबरोबर त्वरित गतीनें जाणाऱ्या मोटारगाड्याहि आहेत. लढाऊ विमानांची संख्या सारखी वाढत आहे. हीं विमानें दर तासास २६५ मैल जातात आणि एका वेळीं तीन हजार मैल जाऊं शकतात. मागील युद्धाचे मानानें ह्या यांत्रिक वहानांचें उत्पादन बेसुमार वाढलें आहे. ब्रिटिश लष्करी वहातुक खात्याच्या मुख्याधिकाऱ्यानें नुकतेंच असें सांगितलें कीं, १९१४ मध्यें गेल्या महायुद्धाचे प्रारंभीं इंग्लंडपाशी जितक्या एकूण मोटार लॉऱ्या होत्या तितक्या दररोज केवळ कारखान्यांत तयार केल्या जात आहेत ! इंग्लंड, फ्रान्स व जर्मनी ह्यांच्या लढाऊ यंत्रसामुग्रीस किती तेल लागत असेल त्याची वरील माहितीवरून कल्पना येईल. विमानें, पाणबुड्या, मोटारगाड्या इत्यादींच्या हालचालींचीं वर्णनें दररोज प्रसिद्ध होत आहेत, त्यांमध्यें तेलाचा अजस्र प्रमाणांत खप चालला असला पाहिजे, हें उघड आहे.

इंग्लंड व फ्रान्स ह्यांचा समुद्रावरील व्यापाराचा मार्ग मोकळा असल्यानें त्यांस तेलाच्या पुरवठ्याची पंचाइत पडत नाहीं. परंतु जर्मनीचें काय ? बाहेरून न येऊं शकणाऱ्या मालाचे ठिकाणीं कृत्रिम रीतीनें बनवलेला स्थानिक माल वापरण्याची व्यवस्था हिटलरनें केली आहे. पण जळाऊ तेलास कार्यक्षम असा बदली अजून त्यांस सांपडलेला नाहीं. अमेरिका, मेक्सिको वगैरे देशांतून तेल आणावयाचें तर वाटेंत ब्रिटिश व फ्रेंच आरमार त्याचा समाचार घेण्यास टपून बसलें आहे. ब्रिटिश नाकेबंदी तोडण्याचे हिटलरी प्रयत्न अयशस्वी झाले आहेत. जळाऊ तेल येण्याचा हा रहदारीचा रस्ता बंद झाल्यानें जर्मनीस पूर्वेकडचा मार्ग शोधणें प्राप्त आहे. पोलंडमध्यें तेलाच्या कांहीं विहिरी आहेत, त्यांपैकी कित्येक रशियाच्या पोलिश मुलखांत आहेत. त्या आपल्या हातीं येतील असें जर्मनीस वाटत होतें. पण त्यांचा व्हावा तसा व तितका उपयोग होत नाहीं असें स्पष्ट दिसत आहे. ह्या कारणानें रुमानियांतील तेलाच्या विहिरींकडे जर्मनीचें पूर्वीपासून लक्ष लागलेलें आहे. बाल्कन राष्ट्रें व पुढें तुर्कस्तान व इराण इकडे आपलें वजन स्थापून तेलाचा पुरवठा निश्चित करण्याचें हिटलरचें धोरण होतें. पण रुमानिया ह्या डावपेचांस बळी पडलेला नाहीं आणि पूर्वेच्या बाजूस इंग्लंड व फ्रान्स ह्यांनीं आपली बाजू खंबीर करून ठेवली आहे. तितकाच प्रसंग आल्यास रुमानियाच्या तेलासाठीं त्या देशावर स्वारी करून तें आपल्या ताब्यांत घेण्यास जर्मनी मागें पुढें पहाणार नाहीं. रुमानिया ही गोष्ट जाणून आहे आणि प्रतिकारार्थ शक्य तेवढी तयारी करीत आहे. बाल्कन देशांत गडबड करावयाचें जर्मनीनें मनांत आणल्यास त्यास रशियाची सहकार्यता लागेल आणि इटलीहि उदासीनपणानें स्वस्थ बसणार नाहीं. त्या देशांतील ब्रिटिश प्रतिनिधींचीं लॉर्ड हॅलिफॅक्स ह्यांच्याशीं कांहीं दिवसामागें लंडनमध्यें बोलणीं झालीं, तीं जर्मनीच्या बाल्कनच्या बाजूच्या तेलाच्या राजकारणाविरुद्ध उपाय योजण्याबाबत होतीं. नॉर्वेमध्यें दूर अंतरावर जर्मनीनें तूर्त युद्ध चालू केलें असल्यानें तेलाच्या पुरवठ्याचा प्रश्न निर्वाणीचा झाला आहे. जर्मनी तेल मिळवल्याची शिकस्त करणार. तर दोस्त राष्ट्रें ह्या पुरवठ्यास शक्य तितका विरोध करणार जर्मनीच्या युद्धाच्या हालचालींचें संबंधांत तेल आहे तोंवर आख्यान चालणार; नाहींतर इतिश्री होणार हें उघड आहे.

—ॐ सत्यमेवजयते—

सुकामेवा एक आणा पाकीट

# लोणच्याचें साहित्य

निवडक सर्व किराणा

म्हणजे

मोहरीची डाळ, मोहरी भुकणी, मोहरी तेल ( पक्क बाटल्या ), मेथी भरडा, स्पेशल हिंग, तांबडे लाल ( भडक ) तिखट भुकणी इत्यादि खात्रीचा माल तयार आहे.

लोणच्याचा तयार मसाला पूड तयार आहे !

## —: दत्तात्रय नारायण हेजीब :—

किराणा व सुकामेवा व्यापारी, २० शुक्रवार पेठ, पुणें २

लोणची, पापड, मसाले मेतकूट सदैव तयार असतात.

### मुक्या जनावरांची युद्धांतील कामगिरी

कुत्रा, हत्ती, उंट व बैल यांचा युद्धांत उपयोग पुरातन काळापासून करण्यांत आला आहे. आधुनिक यांत्रिक युद्धांतहि त्यांचें महत्त्व कायम आहे. घोड्याचें मात्र उच्चाटन झालेलें दिसतें.

तीक्ष्ण कर्णेंद्रियें असलेल्या 'जल-सिंह' नांवाच्या प्राण्यांचा उपयोग गेल्या महायुद्धांत बोटींवर करण्यांत आला. शत्रूच्या पाणबुड्या जवळपास असल्याचा तलास त्यांच्या आवाजावरून जलसिंहाच्या सहाय्यानें लावतां येत असे. हायड्रोफोनचा जर शोध लागला नसता तर चालू युद्धांतहि जलसिंहाचें महत्त्व कायम राहिलें असतें.

हत्तीच्या शरीराची अवाढव्यता व स्वभावतःच असलेली त्याची निर्भय वृत्ति लढाईच्या आणीबाणीच्या अनेक प्रसंगीं उपयोगी पडते परंतु त्याच्या दुसऱ्या स्वभावविशेषामुळें त्याचा युद्धांत उपयोग करणें धोक्याचें असतें. बिथरलेला अगर बराच चिडलेला हत्ती बेभान होऊन सैरावैरा धावतो. मग वाटेंत येईल तो त्याचा शत्रू. हल्लीं टँकचा उपयोग सर्रास केला जात असल्याकारणानें हत्तीचें महत्त्व कांहींसें कमी झालें आहे.

इजिप्तसारख्या देशांत उंट-दलाचें महत्त्व अजून कायम आहे. उंट हा अत्यंत कष्टाळू, कित्येक दिवस पाणी न पितां व बरेच दिवस कांहीं न खातां सडकाळ वाळवंटांतून प्रवास करूं शकणारा प्राणी आहे. मनुष्याला पिण्यास अशक्य असलेलें वाळवंटांतील पाणी उंट पितो आणि त्यास कांहींहि अपाय होत नाहीं. जायबंदी झालेले अगर आजारी पडलेले शिपाई नेण्यास हिंदुस्थानांत उंटांचा बरेच वेळां उपयोग करतात. हा प्रवास जरी शिपायांस सुखावह नसला तरी एकाच वेळीं दोन शिपाई नेतां येतात हा एक मोठा फायदा असतो. शिवाय कांहीं ठिकाणीं उंटाशिवाय कांहींच जाऊं शकत नाहीं. बिकानेरच्या महाराजांचें उंट दल अजूनहि वाखाणलें जातें.

बैलांचा तोफा वाहाण्यास चीनमध्यें उपयोग केला जातो. तारेचीं कुंपणें तोडून मार्ग करण्याकरितां व भू-सुरुंग उडवून देण्याकरितां गुरांच्या कळपांचा उपयोग नुकताच करण्यांत आला. बल्गेरियाच्या सैन्यानें गुरांचे कळप तुर्कस्थानच्या प्रांतांत घुसवले.

कुत्र्यांचा उपयोग प्रत्यक्ष रणभूमीवर व इतर ठिकाणीं केला जातो. आघाडीवर असलेल्या सैन्यास कुत्र्यांचा टपालवाल्याप्रमाणें उपयोग होतो. पोलिस सैन्यांत शत्रू प्रदेशाची पाहाणी करण्यास, सामान आणण्यास, युद्धाच्या आघाडीवर शस्त्रसामुग्री पोंचविण्यास व प्रसंगीं टेलफोनच्या तारा ओढण्यास कुत्र्यांचा उपयोग केला जातो.

डॉबरमॅन, एअरडेल आणि अल्सेशिअन या जातींच्या कुत्र्यांना ब्रिटनमध्यें पोलीसाचें काम देण्यांत येतें. ऑस्ट्रेलियन लोकांनी या पोलीस-कुत्र्यांबरोबर आठ पौंडी रेडियो सेट लावून त्यांतून त्या कुत्र्यांना हुकूम फर्माविण्याची योजना केली आहे.

बो रेक्स नांवाची ऑस्ट्रेलियन कुत्र्यांची एक जात आहे. तो कुत्रा दोन बंदुका पन्नास वेळां मारण्यास पुरतील इतक्या गोळ्या, एक टिकाव, एक फावडें, आणि २० पौंड इतर सामान एका वेळीं नेतो. तो कुत्रा दिवसा अगर रात्रीं केव्हांहि दोन मैलांत दडविलेला पदार्थ शोधून काढतो. तसाच दोन मैलांत कोठेंहि पुरलेला पदार्थ शोधून घेऊन येतो; मग वाटेंत कितीहि गर्दी असो, रस्त्यांची कितीहि वळणें असोत अगर मोठमोठाल्या इमारती व दुकानें असोत.

### थेंबे थेंबें, तळें साचें

ग्रेटब्रिटनमधील १½ कोटि लोकांस आगकाड्या लागतात, त्यांनीं दररोज प्रत्येकीं १ काडी कमी ओढली तर वर्षास १८½ कोटि पेट्या कमी लागतील आणि १ कोटि १५ लक्ष रुपयांची बचत होईल. प्रत्येकानें दररोज दोन काड्या कमी ओढल्या, तर बचतींतून एक मोठी युद्धनौका बांधतां येईल. चौक ओलांडतेवेळीं अगर रेल्वे फाटक उघडण्याची वाट पहात असतांना मोटारीचें इंजन कित्येक ड्रायव्हर तसेंच चालू ठेवतात. त्यामुळें एकट्या अमेरिकेंत, दरसाल ४० कोटि गॅलन पेट्रोल वाया जातें आणि त्यामुळें अमेरिकेचें दररोज ७½ लक्ष रुपयांचें नुकसान होतें. गळणाऱ्या पाण्याच्या तोट्यांमुळें ग्रेटब्रिटनमध्यें दरसाल १००कोटि गॅलन पाणी वाया जातें असा अजमास आहे. जर्मनीमध्यें पुरुषांच्या शर्टची मागील बाजू दोन इंचांनीं सक्तीनें कमी करण्यांत आली आहे, त्यामुळें दरसाल १५ लक्ष वार कापड कमी लागतें. ग्रेटब्रिटनमध्यें दरसाल ३१ कोटि पौंड चहा लागतो. ह्यापैकी दोन तृतीयांश चहाच फक्त कामास येतो, कारण जरूरीपेक्षा अधिक पत्ती नेहेमी किटलींत घालण्यांत येते. टाकून देण्यांत येणाऱ्या चहापासून ६० लक्ष रुपयांचें १½ हजार टन टॅनिन निघूं शकेल.

### कलाकुसरीच्या कामाचें शिक्षण

सोन्याचांदीचे, लाकडावरील व दगडावरील नक्षीकामाचें शिक्षण घेऊं इच्छिणाऱ्या ह्या धंद्यांतल्या परंपराज उमेदवारांकडून शिष्यवृत्त्यांसाठी मुंबईच्या औद्योगिक खात्याच्या डायरेक्टरांनीं अर्ज मागवले आहेत. प्रत्येक शिष्यवृत्ति मासिक १० रुपयांची असून जे. जे. स्कूल ऑफ आर्ट मुंबई येथें किंवा ह्या प्रांतांत दुसऱ्या ठिकाणीं शिक्षणाची सोय केली जाईल. शिष्यवृत्त्यांची एकूण संख्या दहा आहे. खेडेगांवीं कलाकुसरीच्या धंद्यांतील लोकांस अलीकडील गरजांस अनुसरून नवीन नमुने व कामाच्या पद्धती ह्यांचा उपयोग करण्यास शिकविणें हा या उपक्रमाचा हेतु आहे. ह्या शिष्यवृत्त्यांची मुदत तूर्त एक वर्षाची असून पुढें जरूर दिसल्यास दोन वर्षांची केली जाईल. उमेदवारांचें वय १८ ते २० च्या दरम्यान असलें पाहिजे आणि ठराविक नमुन्याप्रमाणें डायरेक्टर ऑफ इंडस्ट्रीज, मुंबई, ह्याकडे २० मे पूर्वी अर्ज पाठवले पाहिजेत.

### पदकें

युद्धांत विशेष कामगिरी बजावणारास पदकें देण्यांत येतात, परंतु तीं जाहीर झाल्यापासून सैनिकांचे प्रत्यक्ष हातीं पडण्यास कित्येक वर्षें लागतात. १८३४-३५ च्या काफीर युद्धा बाबतचीं पदकें १८५४ मध्यें दिलीं गेलीं. १७९९ ते १८२६ ह्या मुदतींतील पराक्रमासाठीं "इंडिया मेडल" काढण्यांत आलें, तें १८५१ मध्यें सैनिकांस मिळूं शकलें. श्रीरंगपट्टमच्या लढाईमधील मर्दुमकीच्या बक्षिसाचें पदक १५ वर्षांनीं १८१५ मध्यें तयार झालें. दिरंगाईची ही रूढी १९१४-१८ च्या महायुद्धाबाबत पाळण्यांत आली असती, तर तेव्हांच्या लढवय्यांस अजून त्यांच्या पदकांची वाट पहावी लागली असती.

### सहकारी शिक्षणाचा वर्ग

कराड व पाटण तालुक्यांतील सहकारी कार्यकर्त्यांनीं सूचना केल्यावरून सहकारी शिक्षणाचा वर्ग टेंभू, ता. कराड येथें ता. १।५।४० ते ता. ४।५।४० असेरचा काढण्याचें ठरलें आहे. सदर वर्गांत निरनिराळ्या सोसायट्यासंबंधीं माहिती, सावकार, कर्ज निवारण करणेचा कायदा व त्यासारखीं पास झालेलीं इतर बिलें, वगैरे विषयांची माहिती दिली जाणार आहे. वर्गाचा व इतर खर्च प्रत्येकानें स्वतःचा करावयाचा आहे.

## निवडक बाजारभाव

बँक रेट ( २८ नोव्हेंबर, १९३५ पासून ) ... ३%

### सरकारी आणि निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ५% करमाफ लोन ( १९४५–५५ ) | ११२—१ |
| ५% ( १९४०–४३ ) लोन | १०१—८ |
| ४% १९४३ | १०६—० |
| ३½% बिनमुदत | ९४–१० |
| ३½% १९४७–५० | १०३–१० |
| ३% ( १९६३–६५ ) | ९४–१२ |
| २½% १९४८–५२ | ९७—२ |
| ४% पोर्ट ट्रस्ट ( लांब मुदत ) | १०५—० |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) | १०४—८ |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५१–६१ ) | ११०–१२ |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५५ ) | १२१—० |

### मंडळ्यांचे भाग

( कंसातील पहिला आकडा भागाची दर्शनी किंमत, दुसरा आकडा वसूल झालेलें भांडवल व कंसानंतरचा आकडा वार्षिक डिव्हिडंड दर्शवितो.)

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया ( १००—५० ) ११% | ११९—० |
| बँक ऑफ बरोडा ( १००—५० ) १०% | १०२—२ |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५०—२५ ) ४% | ३७–२ |
| इंपिरिअल बँक ( ५०० ) १२% | १५३५—० |
| बांबे प्रॉ. को. बँक ( ५० ) ४% | ५३—० |
| रिझर्व्ह बँक ( १०० ) ३½% | १०५—८ |

#### वीज

| | |
|---|---|
| बाँबे ट्रॅम्वे ऑर्डि. ( ५० ) ११% | १३४—० |
| कराची ( १०० ) ९% | १९५—० |
| पुणें इलेक्ट्रिक ( १०० ) ९% | १८२—८ |
| टाटा पॉवर ऑर्डि. ( १००० ) ५½% | १३४७—८ |
| आंध्र व्हॅली ऑर्डि. ( १००० ) ७½% | १५३०—० |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड–बारामती ( १०० ) ४½% | ९५—८ |
| पाचोरा–जामनेर ( १०० ) २% | ६४—० |
| अहमदाबाद प्रांतज ( ५०० ) १२½% | ९९२—८ |
| तापी व्हॅली ( ५०० ) ७½% | ७६७—८ |

#### इतर

| | |
|---|---|
| बेलापूर शुगर ( ५० ) ७ रु. | २१९—८ |
| इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट ( १००–५० ) २ रु. | ४८–१२ |
| शिंदिया स्टीम ( १५ ) १ रु. | २१—८ |
| न्यू इंडिया विमा ( ७५–१५ ) १ रु. | ३९–४ |
| ओरिएंटल विमा ( २०० ) १२५ रु. | ४३८०—० |
| टाटा आयर्न प. प्रे. ( १५० ) ६% | २०८–१२ |
| टाटा आयर्न दु. प्रे. ( २०० ) १५ रु. २ आ. | १४८—८ |
| टाटा आयर्न ऑर्डि. ( ७५ ) १५ रु. | ४१०—० |
| टाटा आयर्न डिफर्ड ( ३० ) ७५ रु. ११ आ. ३ पै | २२५०—० |
| असोसिएटेड सिमेंट ( १०० ) ५ रु | १२१—८ |

#### सोनें–चांदी

| | |
|---|---|
| सोनें ( मिंट ) प्रत्येक तोळ्यास | ४२—७—९ |
| चांदी प्रत्येक १०० तोळ्यास | ५८—२—६ |


## पूर्व खानदेश सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि.

जळगांव.

( स्थापना : मे १९१६ ) रु.

| | |
|---|---|
| अधिकृत शेअर भांडवल. ...... | १०,००,०००।– |
| जमा झालेलें शेअर भांडवल....... | ४,६९,०००।– |
| रिझर्व्ह फंड. ...... | २,९८,०००।– |
| इतर फंडस्. ...... | ३,७७,०००।– |
| खेळतें भांडवल (३०-६-३९) ...... | ५७,८९,०००।– |

डिव्हिडंड पांच टक्के (सहा वर्षांपासून)

हेड ऑफिस :—सेंट्रल को-आपरेटिव्ह बँक बिल्डिंग, नवी पेठ, जळगांव.

पूर्व खानदेश जिल्ह्यांतील सर्व भागांत शाखा व पे-ऑफिसेस चांगल्या रीतीनें चालू आहेत.

:- बँकर्स :-

मुंबई : मुंबई प्रॉव्हिन्शिअल को-आपरेटिव्ह बँक लि. मुंबई.
जळगांव : इंपीरिअल बँक ऑफ इंडिया.
अहमदाबाद : बँक ऑफ इंडिया लि.
नागपूर : सी. पी. अँड बेरार प्रॉव्हिन्शिअल को-ऑपरेटिव्ह बँक लि. नागपूर.

बँकेचे हिशेब त्रैमासिक रजिस्टर्ड अकौंटंटचे फर्मकडून व वार्षिक सरकारी स्पेशल ऑडिटराकडून तपासले जातात.

चालू ठेवीवर : अर्धा टक्का व्याज दिलें जातें.
सेव्हिंग्ज ठेवीवर : दोन टक्के व्याज देण्यांत येतें.
मुदतीच्या ठेवीवर : तीन ते साडे चार टक्के व्याज मुदतीप्रमाणें देण्यांत येतें.

ठेवीदाराचे व्यवहार सोयीप्रमाणें बँकर्स मार्फत केले जातात. बँकेशीं व्यवहार करणारांचे सोयीप्रमाणें बँकर्स मार्फत योजना करण्यांत येते.

सर्व प्रकारच्या मुदतीच्या ठेवी स्वीकारण्यांत येतात. सर्व प्रकारचा बँकिंगचा व्यवहार केला जातो. ठेवीवरील व्याजाचे दर अगर व्यवहाराच्या अटी समक्ष अगर पत्रद्वारें कळविण्यांत येतील.

को-ऑपरेटिव्ह संस्थांना मुदतीच्या ठेवीवर इतरांपेक्षां अर्धा टक्का व्याज जास्त देण्यांत येतें.

बी. डी. देशमुख,
चेअरमन.



## बँका आणि त्यांचे व्यवहार

दुसरी ताजी आवृत्ति प्रसिद्ध झाली.

☞ किं. १ रु. ८ आणे ☜

१ रु. १० आ. ६ पै चीं तिकिटें पाठवून मागणी करा.

: लेखक :

प्रो. वा. गो. काळे ◆ श्री. श्री. वा. काळे

बँकिंगविषयक प्रश्नांचें विवेचन करणारें अत्यंत उपयुक्त पुस्तक

" अर्थ " ग्रन्थमाला, : : पुणें ४.

# CONFIDENCE

is a worth-while asset in business building. The success that has attained Hindusthan's efforts to serve the public has its origin in public confidence, its,

## YEARS OF

Efficient Management, Fair Dealings, Prompt Settlement of Claims, Liberal Terms, Enterprize, Judicious Reserves, Sound Investments, Huge Assets and Useful Service

HAS CREATED

## PUBLIC CONFIDENCE

The following figures will convince you:

## NEW BUSINESS

**Last year 1937-38**

**Exceeds**

**Rs. 3 CRORES**

## BONUS

PER THOUSAND PER YEAR

**On Endowment Rs. 23 | On Whole Life Rs. 20**

# HINDUSTHAN

## Co-operative Insurance Society, Ltd.

( ESTD. 1907 )

*Branches :* Bombay, Madras, Delhi, Patna, Lahore, Lucknow, Dacca.

*Office :* throughout India & the East.

S. C. MAJUMDAR,
MANAGER : Bombay Branch.

POONA OFFICE — 180, Budhwar Peth



## N. V. WADNERKAR

Gold & Silver Smith, Jeweller & Engraver, Electro-plater & Manufacturer of Sporting Trophies, Medals, Cups etc.

- - Raviwar Peth, Saraff Bazar, - -

POONA CITY.



## अर्थशास्त्र

लेखक—प्रो. वा. गो. काळे व प्रो. द. गो. कर्वे

पृष्ठसंख्या सुमारें १००, किंमत १ रुपये

या ग्रंथांत अर्थशास्त्राच्या सर्वसामान्य सिद्धांताचें विवेचन केलें आहे.



फर्म, कंपनी, सोसायटी

## कायदा

लेखक : श्री. के. वा. गजेंद्रगडकर, वकील, बी. ए. ( ऑनर्स ), एलएल. बी.

"न्यायबोध"या कायद्याच्या मासिकांतून क्रमशः प्रसिद्ध झालेली लेखमाला आतां पुस्तकरूपानें तयार झाली. फर्म, कंपनी, सोसायटी यांच्या कायद्यासंबंधीं विवेचन या पुस्तकात केलेलें आहे. हें विवेचन मुंबई इलाख्यांतील कायद्याला अनुसरून असल्यामुळें हें पुस्तक संग्रहीं ठेवणें अवश्य आहे. ट.ख. सह किंमत ८६ आण्यांचीं तिकिटें पाठवा.

मॅनेजर : सेंट्रल लॉ हाउस,
तुळशीबागरोड :: नागपूर शहर



## विमा—जगत्

विमाविषयक प्रश्नांची सांगोपांग चर्चा करणारें मराठींतील एकमेव मासिक.

जानेवारी १९४० पासून ३ ऱ्या वर्षास सुरुवात.
केव्हांहि वर्गणीदार होतां येतें.

वार्षिक वर्गणी फक्त २ रुपये

दर महिन्याच्या १५ तारखेस प्रसिद्ध होतें.
व्यवस्थापक—विमा—जगत्, पुणें २.






**स्त्रियांचा आजार** म्हणजे मुख्यतः विटाळ-दोष व गर्भाशयांत बिघाड होणें होय. आमचें औषध आर्डोमिक्स ( आर्तवदोषारि ) एका निष्णात स्त्रीरोग-चिकित्सकाचे यादीवरून तयार केलेलें असून आज सतत १० वर्षांच्या अनुभवानें स्त्रियांच्या सर्व प्रकारच्या गुप्त रोगांवर अप्रतिम गुणदायक ठरलेलें आहे. धुपणी, विटाळ नसणें, थोडा अथवा कष्टदायक होणें, ओटी पोटांत कळा मारणें, ज्वर, कडकी, अकालीं गर्भपात, होणें दुखणें, शौचास साफ न होणें; इत्यादि, विटाळदोष नाहींसे करून गर्भाशय निरोगी करण्याचा हमखास गुण या आर्डोमिक्समध्ये असल्यामुळें वैद्य व डॉक्टर मोठ्या प्रमाणावर वापरीत आहेत.

किंमत बाटलीस १ रुपये, टपालखर्च १२ आणे. एकदम ३ बाटल्या मागविणारांस टपालखर्चासह फक्त ९ रुपये.

धी इंडो फॉरिन एजन्सीज. ( डि. के. १ )
१५३।१ माधवविलास, शिवाजीनगर, पुणें ५.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाविलास,' भांबुर्डा, घ. नं. १२७।१ ३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.